# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २६.०५.२०२४ (रविवार)**

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक
## वाहनासह एकुण २०,३०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक २५/०५/२०२४ चे ०५/४५ वा. ते ०६/१५ वा. दरम्यान पोस्टे भिवापुर येथील स्टाफ पोस्टे भिवापुर परिसरात पेट्रोलिंग करित असता गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली की, मौजा तास येथे ट्रॅक्टर ट्रॉलीद्वारे अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त बातमीवरून स्टाफने मौजा तास भिवापुर येथे नाकाबंदी करून रेती वाहतुक करणारा टिप्पर क्र. एम एच. —३२/ए.जे २९९९ चा चालक **आरोपी नामे— गणेश परमानंद बनकर वय १९ वर्ष रा कोरंबी ता पवनी जि भंडारा** याने आपले **मालक आरोपी नामे— स्वप्नील अरूण भुरे वय २४ वर्ष रा पवनी ता भंडारा यांचे सांगणेवरून** आपल्या ताब्यातील वाहनामध्ये विनापरवाना (रॉयल्टी) रेतीची चोरटी वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने आरोपीचे ताब्यातून १० चक्का टिप्पर क्र. एम एच. —३२/ए. जे २९९९ किंमती २०,००,०००/— रू. व सहा ब्रॉस रेती किमती ३०,०००/— रू. असा एकुण २०,३०,०००/— रू. चा मुद्देमाल गौनखनीज विनापरवाना शासकीय संपत्तीची चोरी करून वाहतुक करतांना मिळुन आल्याने जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोहवा राकेश त्रिपाठी पोस्टे भिवापुर यांचे रीपोर्टवरून पोलीस स्टेशन भिवापुर येथे **आरोपी नामे— चालक गणेश परमानंद बनकर वय १९ वर्ष रा कोरंबी ता पवनी जि भंडारा, २. मालक नामे— स्वप्नील अरूण भुरे वय २४ वर्ष रा पवनी ता भंडारा** याचेविरूद्ध कलम ३७९,१०९,३४ भा.द.वी. सहकलम ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली **पोस्टे भिवापुर येथील ठाणेदार सपोनि श्री जयप्रकाश निर्मल, पोउपनि संदीप सडमेक, परी. पोउपनि किरण महागावे, पोहवा आनंद धात्रक, राकेश त्रिपाठी, पोशि स्वप्नील ठाकरे, वासुदेव समर्थ, प्रितम खोपे यांनी** यांनी पार पाडली.

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक
## वाहनासह एकुण ५,००,००० /— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक २४/०५/२०२४ चे २३/१५ वा. ते २३/३० वा. दरम्यान पोस्टे खापरखेडा येथील स्टाफ रोहणा गावाकडे पेट्रोलिंग करित असतांना वलनी नदीच्या पात्रातुन ट्रॅक्टर ट्रॉलीद्वारे अवैधरीत्या रेतीची चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या बातमीवरून नमुद ठिकाणी गेलो असता चोरटी वाहतुक करणारा ट्रॅक्टर क्र. एम एच. —४०/बी.जी २७१९ व ट्रॉली क्रमांक एम एच ४० सीएच ९१७८ हा पोलीसांचे भितीने आपले ट्रॅक्टर घेवुन पळुन जात असता त्यांस अंधारात गड्डयाचा अंदाज न आल्याने चालकाचे नियंत्रण सुटुन मुंडा व ट्रॉली पलटी झाल्याने चालकाचे खांद्याला मार लागल्याने त्याचा दवाखान्यात उपचार करून त्याचे ताब्यातुन ट्रॅक्टर क्र. एम एच. —४०/बी.जी २७१९ व ट्रॉली क्रमांक एम एच ४० सीएच ९१७८ किमती ४,५०,००००/— व व ४ ब्रॉस रेती किमती ५०,०००/—रू असा एकुण ५,००,०००/—रू चा माल चा मुद्देमाल गौनखनीज विनापरवाना शासकीय संपत्तीची चोरी करून वाहतुक करतांना मिळुन आल्याने जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील चालक **आरोपी नामे—** रोहीत अरूण बोंदरे वय २० वर्ष रा वलनी वस्ती खापरखेडा २) **गबाला साहानी रा वलनी कॉलनी ३) साहेल अंसारी रा वलनी कॉलनी** यांचेवर कारवाई करण्यात आली आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री खाडे मो क्र ९६८९००३४२४ पोस्टे खापरखेडा हे करीत आहे.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पो शी अमित दशरथ खोब्रागडे पोलीस स्टेशन खापरखेडा जि. नागपूर ग्रा. यांच्या रिपोर्टवरून सदर गुन्हयातील **आरोपी नामे— रोहीत अरूण बोंदरे वय २० वर्ष रा वलनी वस्ती खापरखेडा २) गबाला साहानी रा वलनी कॉलनी ३) साहेल अंसारी रा वलनी कॉलनी** यांचेविरूद्ध कलम ३७९,५११,२७९,३३७,१०९ भा.द.वी. सहकलम १८४ मोटर वाहन कायदा कलम ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार धनाजी जळक, सपोनि खाडे, पोलीस हवालदार बोरकर, पोलीस अंमलदार दशरथ खोब्रागडे यांचे पथकाने पार पाडली आहे.

## अवैधरित्या सुगंधीत तंबाखु बाळगणा—या आरोपीस अटक

पोलीस स्टेशन कन्हान येथे दिनांक २५/५/२४ चे १५/१५ वा ते १६/१५ वा दर. रोजी परिसरात पेट्रोलिंग करित असता गुप्त बातमीदारांकडुन माहीती मिळाली वार्ड क्र ०१ हरीहर नगर कन्हान येथे अखिलेश नावाचा इसम हा आपले राहते घरी अवैधरित्या सुगंधीत तंबाखु बाळगुन विक्री करतो, अश्या खबरेवरून सदर ठिकाणी जावुन रेड केला असता त्याचे **घरी बागबान तंबाखू ४७ ज्यावर टोबॅको युझर्स डाई यंगर** (ज्व्ठ ब्ब्व भैरै क्प ल्व्छळम्त ) **असे नाव लिहीलेले एकूण ५६ टिनाचे डब्बे एक डब्बा वनज ५०० ग्रॅम किमती ७२५/रू असा एकुण ५६ डब्बे किमती ४०,६००/—रू चा माल विक्री करीता साठवणुक केल्याचे मिळून आला.**

सदर गुन्हयातील आरोपी नामे—_**अखिलेश विजय वाधमारे वय २४ वर्ष रा वार्ड क्र ०१ हरीहर नगर कन्हान** यास ताब्यात घेवुन विचारपुस केले असता त्याने सदर मुद्देमाल आणुन तो स्वता विक्री असल्याची कबुली दिल्याने त्यास सदर गुन्हयात दिनांक २५.०५.२४ चे १६.०२ वा अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन कन्हान येथे कलम २७२,२७३, ३२८,१८८ भादवी सह कलम २६ (२)(पप) २६(२)(पअ) )२७ (२)(म),३०(२) अन्वयें गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पो.उपनी प्रविन हारगूडे पोस्टे कन्हान मो क्र. ९८३४६८३१८४ करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार पोलीस निरीक्षक उमेश पाटील, पो.उपनी प्रविन हारगूडे पोहवा नरेश श्रावनकर यांचे पथकाने पार पाडली आहे.

## घरफोडी करणा—या आरोपीस अटक

पोलीस स्टेशन कळमेश्वर अंतर्गत यातील फिर्यादी नामे— ईश्वर वामनराव भोकसे वय ३८ वर्ष रा कोहळी कळमेश्वर हे दिनांक दि १४/०४/ २०२४ ला सायंकाळी ०७/०० वा बंगल्यावर सगळ्या वस्तु ठेवुन बंगल्याला लॉक लावुन चाबी स्वताजवळ घेउन घरी आला, असता दिनांक १५/०४/ २०२४ रोजी सकाळी ०५/०० वा. दरम्यान यातील फिर्यादी शेतातील बंगल्यावर गेले असता बंगल्याचा दरवाजा उघडा दिसला व आतमध्ये जाउन पाहीले असता **ढेपच्या १२ बॅग पैकी ११ बॅग किंमती १४,०००/— रुपये तसेच ट्रॅक्टरसाठी आणुन ठेवलेले ६० लिटर डिझेल ३ डबकी सह किंमती ६,०००/— रुपये असा एकुण २०,०००/—रुपयाचा माल** दिसुन आला नाही. ृफिर्यादिने त्याच्या ट्रॅक्टरवर ठेवलेला चालक मनोज झाडे रा खापरी वर संशय असल्याचे सांगितल्याने फिर्यादिच्या तोंडी रिपोर्ट वरून पोस्टे कळमेश्वर येथे आरोपीविरूध्द कलम ४५७,३८० भादवि चा गुन्हा नोंद असुन तपासात होता.

सदर गुन्हयातील आरोपीचा शोध घेण्याकरीता पथक तयार करून वेगवेगळया ठिकाणी रवाना केले असता यातील आरोपी नामे— **१) मनोज गिरीधर झाडे वय ३२ वर्ष रा खापरी हमु.पाहूणी ता मोहाडी जि. भंडारा २) तनवीर युनुश कुरैशी वय २५ वर्ष रा. धापेवाडा ईदीरा गांधी नगर ता. सावनेर** यांना ताब्यात घेवुन त्यास विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याचे कबुली दिल्याने नमुद दोन्ही आरोपीस दिनांक २५.०५.२०२४ रोजी अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री योगेश कामाले, व त्यांचे स्टॉफने पार पाडली आहे.

## लोखंड चोरी करणा—या फरार आरोपीस अटक

पोलीस स्टेशन कन्हान अंतर्गत फिर्यादी नामे— बिजेश श्रीराम मिश्रा वय ३८ वर्ष रा पाटनकर चौक नागपुर यांनी रिपोर्ट दिला कि दिनांक ०५.०४.२४ चे ०८.०० वा ते ०८.३० वा दर कांद्री पेट्रोलपंच चे समोर पारशिवनी येथून यातील आरोपींनी संगनमत करून ३ चक्का अल्फा ऑटो क्र एम.एच ४९ ए.टी ३७५९ या वाहनात ५०० किलो लोहा अंदाजे किंमत ८,०००/—रू चा माल चोरून नेतांनी मिळुन आल्याने सदर आरोपीविरूध्द कलम ३७९ भादविचा गुन्हा नोंद होता.

सदर गुन्हयातील आरोपी नामे— **अभिषेक उर्फ चिंटू अमीतसिग राजपुत वय २४ वर्ष .रा खदान नं ६ कन्हान** हा घटना तारखेपासुन फरार होता. त्याचा शोध घेवुन विचारपुस केली असता त्यांने सदर गुन्हा केल्याची कबुली दिल्याने त्यास दिनांक २५.०५.२४ रोजी अटक करण्यात आली आहे. पुढील तपास पोहवा/ गुरूप्रकाश मेंश्राम पोस्टे कन्हान मोंनं ९८२३४५३१६९ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री उमेश पाटील, व त्यांचे स्टॉफने पार पाडली आहे.

**पोलीस माहीती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण),नागपुर**